**शपथेवर उलटतपास सुरु...**

**उलटतपास – विधिज्ञ श्री एस.एस. मुतालिक, जाबदारतर्फे**

१०. माझे शिक्षण १० वी पास आहे. याकामी मी माझ्या नेमणूकीचा आदेश दाखल केलेला आहे. माझी सुरुवातीची नेमणूक ही हंगामी होती. मी हंगामी म्हणून लागलो त्यावेळी टर्नरचे काम करीत होतो. माझे टर्नरचे शिक्षण झालेबद्दल दाखला आहे. ते मी याकामी दाखल केलेले नाही. जाबदारांचा साखर उत्पादनाचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की कारखान्याच्या उत्पादन प्रक्रियेत विविध विभाग कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे जाबदार कारखान्यात साखर कामगारांची श्रमिक संघटना (इंटक) कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर संघटना कामगारांच्या प्रश्नांविषयी व्यवस्थापनासोबत चर्चा करीत आली आहे. हे मला माहित नाही सदर संघटना ही व्यवस्थापनासोबत कामगारांच्या सेवा शर्थीविषयी करार करीत आलेली आहे. मी सदर श्रमिक संघटनेचा सभासद होतो मात्र त्याचा कालावधी मला आठवत नाही. हे मला माहित नाही की श्रेमिक संघटनेसोबत झालेल्या कराराचे लाभ मला कारखान्याकडून प्राप्त होत होते. हे म्हणणे खरे आहे की श्रमिक संघटनेच्या पदाधिका–यांचे संचालक मंडळ असते.

११. मी संघटना प्रतिनिधी होतो. संघटना प्रतिनिधी हे कामगारांमधून निवडले जातात. त्यानुसार माझ्या खात्यातून माझी निवड झाली होती.

प्रश्न– श्रमिक संघटनेच्या कामाची तुम्हांला माहिती आहे ?

उत्तर– मला बैठकीकरिता बोलविले जात नव्हते.

हे मला माहित नाही की साखर कारखान्यातील कामगारांना वेतन मंडळाचे लाभ मिळत होते. सदर कारखान्यास मुंबई औद्योगिक संबंध अधिनियमाच्या तरतुदी लागू होत्या की नाही हे मला माहित नाही. मला औद्योगिक विवाद कायदयाबद्दल माहिती नाही. मी कारखान्यात काम करीत होतो त्यावेळी किती कामगार कार्यरत होते

याची मला माहिती नाही.

विधिज्ञ मुतालिक यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकूब करण्यात आला.

Sd/-

सांगली. (दि.मा. पाटील)

सदस्य,

दिनांक - १५/०७/२०२४. औद्योगिक न्यायालय, सांगली